नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ रे Year - 4rd | अंक - १२४ Issue - 124 | वार - मंगळवार दि. २९ सप्टेंबर २०२६ Blow- Tuesday Date 29 SEPTEMBER 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थितीची केंद्राकडून दखल; केंद्रीय पथक पाहणी करणार

## कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान वरिष्ठ अधिकाऱ्यांसह दौरा करणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्रातील सुमारे दोन-तृतीयांश भूभाग दुष्काळाने प्रभावित झाल्याच्या पार्श्वभूमीवर केंद्र शासनाने राज्यातील परिस्थितीची गंभीर दखल घेतली आहे. दुष्काळी परिस्थितीचा प्रत्यक्ष आढावा घेण्यासाठी महाराष्ट्रात केंद्रीय पथक पाठविण्यात येणार असून, केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण आणि ग्रामीण विकासमंत्री शिवराजसिंह चौहान वरिष्ठ अधिकाऱ्यांसह महाराष्ट्राचा दौरा करणार आहेत.

नवी दिल्लीतील पुसा येथील भारतरत्न सी. सुब्रमण्यम सभागृहात आयोजित दोन दिवसीय राष्ट्रीय कृषी संमेलन-रब्बी अभियान २०२६ च्या उद्घाटन सत्रात ते बोलत होते. यावेळी केंद्रीय कृषी राज्यमंत्री रामनाथ ठाकूर व भागीरथ चौधरी, केंद्रीय कृषी सचिव अतीश चंद्रा, भारतीय कृषी संशोधन परिषदेचे महासंचालक डॉ. एम. एल. जाट यांच्यासह केंद्र व विविध राज्यांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

महाराष्ट्रातील सुमारे दोन-तृतीयांश क्षेत्र दुष्काळाच्या विळख्यात असल्याचे नमूद करत चौहान यांनी केंद्र सरकार राज्यातील परिस्थितीबाबत गंभीर असल्याचे स्पष्ट केले. महाराष्ट्रासह कर्नाटकातील दुष्काळी परिस्थितीचे केंद्रीय पथक प्रत्यक्ष पाहणी करून आकलन करणार आहे. कर्नाटकात ३ ऑक्टोबर रोजी केंद्रीय पथक दाखल होणार असून, त्यानंतर महाराष्ट्रातही पथक पाठविण्यात येणार आहे. आपण स्वतः वरिष्ठ अधिकाऱ्यांसह या राज्यांचा दौरा करणार असल्याचे चौहान यांनी सांगितले.



महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर रब्बी हंगामातील पीक नियोजन उपलब्ध पाण्याच्या ताळेबंदावर आधारित असावे, असे चौहान यांनी स्पष्ट केले. प्रत्येक राज्य आणि जिल्ह्याने सिंचनासाठी उपलब्ध पाणी तसेच जमिनीतील ओलावा यांचे मूल्यमापन करून त्यानुसार पिकांची निवड करावी.

पाणीटंचाई असलेल्या महाराष्ट्रातील भागांमध्ये कमी पाण्यात येणाऱ्या कडधान्ये आणि तेलबिया पिकांना प्राधान्य द्यावे. पुरेशी सिंचन सुविधा असलेल्या भागात उपलब्ध पाण्यानुसार अन्य पिकांचे नियोजन करावे. उपलब्ध पाण्यापेक्षा अधिक पाण्याची गरज असलेले पीक घेतल्यास नंतर पाणीटंचाईमुळे पीक संकटात येण्याची शक्यता असल्याचा इशाराही त्यांनी दिला. महाराष्ट्रासह कर्नाटक, तेलंगणा आणि आंध्र प्रदेशातील दुष्काळी परिस्थितीचा संदर्भ देताना पाण्याची उपलब्धता, जमिनीतील ओलावा आणि त्यानुसार योग्य पीक यांचे नियोजन आधीच करणे आवश्यक असल्याचे चौहान यांनी सांगितले. पेरणीला विलंब झाल्यास उगवण आणि उत्पादनावर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे शेतकऱ्यांनी बियाणे, खते आणि अन्य निविष्ठांची पूर्वतयारी करून वेळेत पेरणी करावी, असे आवाहन त्यांनी केले.

### महाराष्ट्रात कडधान्ये-तेलबियांचे क्षेत्र वाढविण्यावर भर

धान कापणीनंतर रिकाम्या राहणाऱ्या क्षेत्रात हरभरा, मसूर आणि मोहरीसारख्या कडधान्ये व तेलबिया पिकांची लागवड वाढविण्याचे आवाहन करण्यात आले. कमी पाण्यात येणाऱ्या या पिकांमुळे उपलब्ध जलस्रोतांचा कार्यक्षम वापर होण्याबरोबरच देशाची कडधान्ये व खाद्यतेल क्षेत्रातील आत्मनिर्भरता वाढण्यास मदत होईल. - राज्यांनी रब्बी हंगामातील कडधान्याखालील क्षेत्र आणि उत्पादनाचे निश्चित लक्ष्य ठरवावे तसेच शेतमालाच्या खात्रीशीर खरेदीची व्यवस्था आधीच तयार ठेवावी, असे निर्देश देण्यात आले. राज्यांकडून वेळेत खरेदी न झाल्यास नाफेड आणि एनसीसीएफ या केंद्रीय संस्था थेट शेतकऱ्यांकडून खरेदी करतील, असे चौहान यांनी स्पष्ट केले. - रब्बी हंगामासाठी बियाण्यांची मागणी, उचल आणि वितरणाचा आराखडा आगाऊ तयार ठेवण्याचे निर्देश देण्यात आले. महाराष्ट्रातील विविध हवामान पट्टे आणि पाण्याची उपलब्धता लक्षात घेऊन योग्य वाणांची निवड व वेळेत उपलब्धता सुनिश्चित करण्यावर भर देण्यात आला.कृषी विद्यापीठे, भारतीय कृषी संशोधन परिषद आणि कृषी विज्ञान केंद्रांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना योग्य वाण आणि पीक व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन देण्याचे आवाहन करण्यात आले.

# राज्य सेवा मुख्य परीक्षा २०२६ पुढे ढकलली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई: महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. २०२६ च्या राज्यसेवा मुख्य परीक्षा आणि इतर परिक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घेतलेला आहे. २०२५ मध्ये झालेल्या राज्यसेवा मुख्य परिक्षेच्या उत्तरपत्रिकांचे पुन:र्मुल्यांकन करण्याचा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. काही तासांपूर्वीच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून प्रसिद्धीपत्रक काढून हा महत्त्वाचा निर्णय जारी करण्यात आलेला आहे. गेल्या काही महिन्यांपूर्वी राज्यामध्ये झालेल्या पेपरफुटीच्या प्रकरणामुळे हा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आलेला आहे.



अनेक विद्यार्थी आणि विद्यार्थी संघटनांकडून २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या राज्यसेवा मुख्य परिक्षेच्या मुल्यांकनाबद्दल आक्षेप नोंदवण्यात आला होता. हाच आक्षेप लक्षात घेत, राज्य सेवा मुख्य परिक्षा-२०२५ च्या उत्तर पत्रिकांचे पुन:र्मुल्यांकन करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे २०२६ मध्ये होणारी राज्यसेवा मुख्य परीक्षा आणि इतर परिक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घेतलेला आहे.

वारंवार पेपरफुटीचे प्रकरण होत असल्यामुळे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यपद्धतीमध्ये सुधारणा घडवून आणण्याची मागणी अनेक विद्यार्थी संघटनांकडून केली जात आहे. इतकंच नाही तर, विद्यार्थ्यांकडून आणि पालकांकडूनही आयोगाच्या अध्यक्षांनी या कथित घोटाळ्यांची जबाबदारी स्वीकारून राजीनामा दिला पाहिजे, अशी मागणीही केली जात आहे.

दरम्यान, ३ ऑक्टोबर २०२६ पासून आयोजित करण्यात आलेल्या मुख्य परिक्षा पुढे ढकलण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय आयोगाने घेतला. विद्यार्थी, पालक आणि लोकप्रतिनिधींनी केलेल्या मागण्यांचा विचार करून आयोगाने 'राज्य सेवा मुख्य परीक्षा-२०२६', 'महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी मुख्य परीक्षा-२०२६' आणि 'महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) मुख्य परीक्षा-२०२६' या परिक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला आहे. या परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या असून अद्याप आयोगाकडून परीक्षेची नवीन तारीख जाहीर केलेली नाही. या सर्व परीक्षांच्या सुधारित तारखा लवकरच स्वतंत्रपणे जाहीर करू असं आयोगाने प्रसिद्धीपत्रकामध्ये म्हटले आहे.

# पीटी उषाचा ४२ वर्षांचा ऐतिहासिक रेकॉर्ड मोडला; विथ्या रामराजचा आशियाई स्पर्धेत धडाकेबाज पराक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : २०२६ च्या आशियाई खेळांमध्ये भारतीय खेळाडूंचा डंका पाहायला मिळत आहे. सोमवारी २८ सप्टेंबर रोजी झालेल्या १५०० मीटर धावण्याच्या शर्यतीत भारताच्या गुलवीर सिंगने आपली सर्वोत्तम कामगिरी करत रौप्यपदक पटकावले. तर दुसरीकडे महिला धावपटू विथ्या रामराजने ४०० मीटर अडथळा शर्यतीत कांस्यपदक जिंकून इतिहास रचला आहे. विथ्याने भारताच्या दिग्गज धावपटू पीटी उषा यांचा तब्बल ४२ वर्षांपूर्वीचा राष्ट्रीय विक्रम मोडीत काढत क्रीडा जगताला थक्क केले आहे.

विथ्या आणि गुलवीर यांच्या या धमाकेदार कामगिरीमुळे आशियाई खेळांमधील भारताच्या पदकांची संख्या आता ४० च्या पार पोहोचली असून देशभरातून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

महिलांच्या ४०० मीटर अडथळा शर्यतीत विथ्या रामराजने अवघ्या ५४.७५ सेकंदात शर्यत पूर्ण केली. ही तिची वैयक्तिक सर्वोत्तम कामगिरी ठरली. या कामगिरीसह तिने १९८४ च्या लॉस एंजिल्स ऑलिंपिकमध्ये पीटी उषा यांनी नोंदवलेला ५५.४२ सेकंदांचा ४२ वर्षे जुना राष्ट्रीय विक्रम इतिहासजमा केला. आता हा राष्ट्रीय विक्रम अधिकृतपणे विथ्या रामराजच्या नावावर नोंदवला गेला आहे. या स्पर्धेत संयुक्त अरब अमिरातीच्या मरियम करीमने ५४.३१ सेकंदांची वेळ नोंदवत सुवर्णपदक पटकावले, तर कझाकस्तानच्या एडेलिना जेम्सने ५४.५८ सेकंद वेळ घेत रौप्यपदकावर कब्जा केला. चालू आशियाई खेळांमधील विथ्या रामराजचे हे दुसरे पदक आहे. याआधी तिने ४x४०० मीटर मिक्स रिले संघात रौप्यपदक जिंकले होते. पुरुषांच्या १५०० मीटर रेसमध्ये गुलवीर सिंगने ३:३६.७२ मिनिटांत शर्यत पूर्ण करून आपले वैयक्तिक सर्वोत्तम टायमिंग नोंदवले आणि रौप्यपदक मिळवले. या शर्यतीत जपानच्या कजुतो इइजावाने ३:३६.३५ मिनिटांत रेस पूर्ण करत सुवर्णपदक जिंकले, तर जपानच्याच नागिया मोरीने ३:३७.९२ मिनिटांच्या वेळेसह कांस्यपदक मिळवले. गुलवीर सिंगचे या आशियाई खेळांमधील हे दुसरे पदक आहे. यापूर्वी गेल्या शुक्रवारी त्याने पुरुषांच्या १०००० मीटर रेसमध्ये २८:२९.३८ मिनिटांची वेळ नोंदवत रौप्यपदक पटकावले होते.

भारतीय ॲथलीट्सच्या या दमदार कामगिरीमुळे आशियाई खेळ २०२६ मधील भारताच्या एकूण पदकांची संख्या ४१ वर पोहोचली आहे. यामध्ये भारताने आतापर्यंत ४ सुवर्णपदकांसह अनेक रौप्य आणि कांस्यपदके जिंकली आहेत. या कामगिरीसह भारत सध्या मेडल गुणतालिकेमध्ये १२व्या स्थानावर विराजमान आहे.

# एनडीएसोबत जाण्यासह विलीनीकरणावर शरद पवारांकडून एक घाव, दोन तुकडे!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई: केंद्रीय मंत्रिमंडळ विस्तारावेळी राज्यासह देशातील राजकीय समीकरणे बदलतील आणि एनडीएच्या ताकदीत वाढ होईल, असा अंदाज वर्तवण्यात येत होता. राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी काही दिवसांत दोनदा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतल्याने पवारांची राष्ट्रवादी भाजपसोबत जाणार असल्याचीही चर्चा रंगली होती. दोन्ही राष्ट्रवादीचं विलीनीकरण होईल आणि त्यानंतर एनडीएमध्ये सहभागी होण्याचा निर्णय घेतला जाईल, असं बोललं जात होतं. मात्र आज अखेर शरद पवार यांनी या सर्व चर्चा धुडकावून लावत आम्ही कुठेही जाणार नसल्याचं स्पष्ट केलं आहे.

शरद पवार यांच्या नेतृत्वात आज मुंबई इथं पक्षाचे प्रमुख नेते आणि पदाधिकारी यांची बैठक पार पडली. या बैठकीनंतर पक्षाच्या आगामी राजकीय वाटचालीबद्दल भाष्य करताना शरद पवार म्हणाले की, मला सांगण्यात आलं, आपल्याबद्दल वेगवेगळ्या चर्चा आहेत. पक्षाचा अध्यक्ष म्हणून मी सांगतो की, होय चर्चा आहेत. पण आपण कोणाच्याही जवळ जाणार नाही. तुम्हाला यायचं असेल तर आमच्यात विलीन व्हा, असं म्हणत शरद पवार यांनी सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादीला सूचक संदेश दिला आहे. त्यामुळे राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष हा सुनेत्रा पवारांच्या नेतृत्वाखालील पक्षात विलीन होईल, या चर्चेला पूर्णविराम देण्याचा प्रयत्न आज पवार यांनी केला आहे. तसंच पवार यांनी तूर्तास तरी विरोधी पक्षात राहून संघर्ष करण्याची तयारी केल्याचं बोललं जात आहे.

राज्यात सध्या दुष्काळामुळे भीषण स्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने २६५ तालुक्यांत दुष्काळ जाहीर करत उपाययोजना करण्याची घोषणा केली आहे. मात्र सरकारच्या या उपाययोजना अपुऱ्या असल्याचं सांगत शरद पवार यांनी सरकारकडे नुकत्याच १७ मागण्या केल्या होत्या. आज पक्षाच्या बैठकीनंतरही पवार यांनी याबाबत भाष्य केलं. दुष्काळाच्या स्थितीत सरकारने तुमचे हात बळकट करणं अपेक्षित आहे. दुष्काळाच्या स्थितीत काही निर्णय राज्यात होत असले तर केंद्रातही काही निर्णय होत असतात. मी केंद्रीय मंत्रिमंडळात असताना तत्कालीन पंतप्रधान मनमोहन सिंह यांनी दुष्काळाबाबत बैठक बोलावली होती. दुष्काळाबाबत निर्णय घेण्याचे अधिकार त्यांनी खासदारांना दिले होते. त्यावेळी आपण शेतकऱ्यांसाठी विविध निर्णय घेतले होते. पण आता सरकारने २६५ तालुक्यांत दुष्काळ जाहीर केला असून इतर तालुक्यांचा यामध्ये समावेश नाही. तसंच केळी पिकालाही मदत करण्यात आलेली नाही, असं पवार यांनी म्हटलं आहे.

## निधी उभारणी, लेखांकन आणि संसाधनांच्या विनियोजनाचा आढावा घ्या

# राज्याच्या आर्थिक व्यवस्थेत सहा महिन्यांत बदल होणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई: राज्याच्या आर्थिक व्यवस्थेत आवश्यक बदल घडवून आणण्यासाठी सहा महिन्यांत सुधारणा आणि कृतीचा आराखडा तयार करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्र शाश्वत सार्वजनिक वित्त समितीला दिले. राज्यातील निधी उभारणी, लेखांकन आणि उपलब्ध संसाधनांचे कार्यक्षम विनियोजन या तीन आघाड्यांवर अधिक वेगाने काम करण्याची गरज असून, समितीच्या शिफारशींची शासनाकडून गांभीर्याने अंमलबजावणी केली जाईल, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले.

राज्याच्या कर आणि करेतर महसुलात वाढ करण्यासाठी उपाययोजना सुचविण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या महाराष्ट्र शाश्वत सार्वजनिक वित्त समितीची बैठक बुधवारी सह्याद्री अतिथिगृहात मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या बैठकीत राज्याच्या आर्थिक व्यवस्थेतील विविध पद्धती आणि प्रणालींचा आढावा घेऊन त्यात आवश्यक बदल करण्याबाबत चर्चा झाली.

पारंपरिक महसूल संकलनाच्या पद्धतींपलीकडे जाऊन राज्याच्या विकास आराखड्याला वित्तपुरवठा करण्यासाठी साधनसंपत्ती उभारण्याचे नवे मार्ग शोधण्याची गरज असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. राज्यातील विविध यंत्रणांकडे सुमारे सहा ते सात हजार कोटी रुपयांचा निधी चार टक्के व्याजदराने गुंतविला जातो, तर दुसरीकडे राज्य शासनाला बाजारातून आठ ते नऊ टक्के व्याजदराने कर्ज घ्यावे लागते. निधी उपलब्ध असतानाही अधिक व्याजदराने कर्ज उभारण्याची ही विसंगती दूर करण्यासाठी योग्य आर्थिक यंत्रणा उभारण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी नमूद केले.



उपलब्ध निधीचा अधिक परिणामकारक वापर करताना संबंधित यंत्रणांचे आर्थिक स्वातंत्र्य अबाधित राहणे आणि त्यांच्या निधीला सुरक्षितताही मिळणे आवश्यक आहे. त्यासाठी अभिनव आर्थिक साधने आणि व्यवस्था विकसित करण्याच्या दृष्टीने समितीने उपाय सुचवावेत, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले. बैठकीस वित्त राज्यमंत्री आशिष जयस्वाल, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, समितीचे अध्यक्ष विजय केळकर, सदस्य कार्थिक मुरलीधरन, रवी शंकर, माजी मुख्य सचिव डॉ. नितीन करीर, महसूल व वने विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, ऊर्जा विभागाच्या प्रधान सचिव आभा शुक्ला, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव विकासचन्द्र रस्तोगी, मुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. श्रीकर परदेशी, वित्त विभागाचे प्रधान सचिव विजय वाघमारे आदी उपस्थित होते.

### खर्च व्यवस्थापनावरही भर

राज्याच्या खर्च व्यवस्थापनात अधिक कार्यक्षमता आणण्याची गरजही फडणवीस यांनी व्यक्त केली. विविध विकास प्रकल्प वेळेत पूर्ण होणे आवश्यक असते. मात्र, निधी नियोजनातील त्रुटींमुळे गुंतवणुकीचा अर्थव्यवस्थेवर अपेक्षित गुणक परिणाम साधला जात नसल्याचे त्यांनी नमूद केले. त्यामुळे राज्याच्या संपूर्ण आर्थिक कारभाराचे नव्याने परीक्षण करून खर्चाची परिणामकारकता वाढविण्यावर भर द्यावा, असे त्यांनी सांगितले. तज्ज्ञ समितीची स्थापना औपचारिकता म्हणून करण्यात आलेली नाही. समितीच्या शिफारशींच्या आधारे शासनाच्या विद्यमान कार्यपद्धती आणि आर्थिक प्रणालींमध्ये आवश्यक बदल केले जातील, असेही फडणवीस यांनी स्पष्ट केले.

# आमदार-खासदारांच्या पत्रांना दोन महिन्यांत उत्तर बंधनकारक : सामान्य प्रशासन विभागाचे निर्देश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : आमदार आणि खासदारांनी शासकीय कामांबाबत पाठविलेल्या पत्रांवर तातडीने कार्यवाही करून जास्तीत जास्त दोन महिन्यांच्या आत अंतिम उत्तर द्यावे, तसेच सरकारी कार्यालयांत भेटीस येणाऱ्या लोकप्रतिनिधींना सौजन्याची वागणूक द्यावी, असे निर्देश राज्याच्या सामान्य प्रशासन विभागाने दिले आहेत. लोकप्रतिनिधींच्या पत्रव्यवहाराचा कार्यालय प्रमुखांनी दर तीन महिन्यांनी आढावा घ्यावा. याशिवाय आमदार-खासदारांच्या भेटी आणि त्यांच्या कामांचा आढावा घेण्यासाठी दर महिन्याच्या पहिल्या आणि तिसऱ्या गुरुवारी दोन तासांचा वेळ राखून ठेवण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत. आमदार आणि खासदारांसोबत सौजन्यपूर्ण वागणुकीबाबत यापूर्वी जारी करण्यात आलेली विविध परिपत्रके एकत्रित करून राज्य सरकारने सुधारित आणि सर्वसमावेशक मार्गदर्शक तत्त्वे सोमवारी शासन निर्णयाद्वारे जारी केली. त्यानुसार लोकप्रतिनिधी कार्यालयात भेटीस आल्यानंतर त्यांना आदराची आणि सौजन्याची वागणूक देणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यांच्याशी दूरध्वनीवरून संवाद साधतानाही आदरयुक्त भाषा आणि शिष्टाचाराचे पालन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

दैनिक
यश सिद्धि न्यूज



## संपादकीय....

### आवश्यक बदल

राज्याच्या आर्थिक व्यवस्थेत आवश्यक बदल घडवून आणण्यासाठी सहा महिन्यांत सुधारणा आणि कृतीचा आराखडा तयार करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्र शाश्वत सार्वजनिक वित्त समितीला दिले. राज्यातील निधी उभारणी, लेखांकन आणि उपलब्ध संसाधनांचे कार्यक्षम विनियोजन या तीन आघाड्यांवर अधिक वेगाने काम करण्याची गरज असून, समितीच्या शिफारशींची शासनाकडून गांभीर्याने अंमलबजावणी केली जाणार आहे. राज्याच्या कर आणि करेतर महसुलात वाढ करण्यासाठी उपाययोजना सुचविण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या महाराष्ट्र शाश्वत सार्वजनिक वित्त समितीची बैठक बुधवारी सह्याद्री अतिथिगृहात मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या बैठकीत राज्याच्या आर्थिक व्यवस्थेतील विविध पद्धती आणि प्रणाल-ींचा आढावा घेऊन त्यात आवश्यक बदल करण्याबाबत चर्चा झाली. पारंपरिक महसूल संकलनाच्या पद्धतींपलीकडे जाऊन राज्याच्या विकास आराखड्याला वित्तपुरवठा करण्यासाठी साधनसंपत्ती उभारण्याचे नवे मार्ग शोधण्याची गरज असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. राज्यातील विविध यंत्रणांकडे सुमारे सहा ते सात हजार कोटी रुपयांचा निधी चार टक्के व्याजदराने गुंतविला जातो, तर दुसरीकडे राज्य शासनाला बाजारा-तून आठ ते नऊ टक्के व्याजदराने कर्ज घ्यावे लागते. निधी उपलब्ध असतानाही अधिक व्याजदराने कर्ज उभारण्याची ही विसंगती दूर करण्यासाठी योग्य आर्थिक यंत्रणा उभारण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी नमूद केले. उपलब्ध निधीचा अधिक परिणामकारक वापर करताना संबंधित यंत्रणांचे आर्थिक स्वातंत्र्य अबाधित राहणे आणि त्यांच्या निधीला सुरक्षितताही मि ळणे आवश्यक आहे. त्यासाठी अभिनव आर्थिक साधने आणि व्यवस्था विकसित करण्याच्या दृष्टीने समितीने उपाय सुचवावेत, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले. राज्याच्या खर्च व्यवस्थापनात अधिक कार्यक्षमता आणण्याची गरजही फडणवीस यांनी व्यक्त केली. विविध विकास प्रकल्प वेळेत पूर्ण होणे आवश्यक असते. मात्र, निधी नियोजनातील त्रुटींमुळे गुंतवणुकीचा अर्थव्यवस्थेवर अपेक्षित गुणक परिणाम साधला जात नसल्याचे त्यांनी नमूद केले. त्यामुळे राज्याच्या संपूर्ण आर्थिक कारभाराचे नव्याने परी-क्षण करून खर्चाची परिणामकारकता वाढविण्यावर भर द्यावा, असे त्यांनी सांगितले. तज्ज्ञ समितीची स्थापना औपचारिकता म्हणून करण्यात आलेली नाही. समितीच्या शिफारशींच्या आध-ारे शासनाच्या विद्यमान कार्यपद्धती आणि आर्थिक प्रणालींमध्ये आवश्यक बदल केले जाणार आहेत.

# कर्मयोगीच्या अविष्कारमध्ये विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला नवे व्यासपीठ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : आधुनिक तंत्रज्ञानाचा सर्जनशील वापर समाजातील सर्वसाम ान्य घटकाचे अधिक सुलभ व सुखकर, सुरक्षित करणारे नाविन्यपूर्ण प्रकल्प विद्यार्थ्यांनी साकार हवेत असे आव्ह-ान पांडुरंग प्रतिष्ठानचे विश्वस्त रोहन परिचारक यांनी केले.

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाच्या वती-ने आयोजित अविष्कार प्रकल्प स्पर्धे चे महाविद्यालयीन स्तरावरील आयोजन कर्मयोगी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, पंढरपूर येथे करण्यात आले, या स्पर्धे च्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.



वद्यार्थ्यांच्या कल्पकतेला संशोधन वृत्तीला आणि नऊ उन्नीशी विचारांना व्यासपीठ उपलब्ध करून देणाऱ्या या स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्तपणे प्रतिसाद मिळाला. महाविद्यालयातील शंभरहून अधिक विद्यार्थ्यांनी विविध नाविन्यपूर्ण प्रकल्प सादर करून आपल्या कल्पकतेचे दर्शन घडविले, त्यापैकी १२ प्रकल्पांची विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी निवड करण्यात आली असल्याची माहिती कर्मवीर इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी चे प्राचार्य डॉक्टर एस पी पाटील यांनी दिली महाविद्यालयाचे संशोधन अधिष्ठाता डॉक्टर अभय उत्पाद यांनी या स्पर्धेचे संयोजन म्हणून काम पाहिले.

या स्पर्धेत हुमिनिटी लँग्वेजेस अँड फाईल आर्ट्स कॉमर्स मॅनेजमेंट अँड लॉ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, मेडिकल अँड फार्मसी सायन्स एग्रीकल्चर अँड ऍनिमल आधी विविध विभागाच्या विद्यार्थ्यांनी प्रकल्प सादर केले व समाजातील प्रत्यक्ष समस्या ओळखून त्यावर तंत्रज्ञानाच्या माध्यमातून उपाय शोधण्याच्या विद्यार्थ्यांचा प्रयत्न विशेष उल्लेखनीय ठरला.

स्पर्धेचे परीक्षण डॉक्टर अनिल बाबर, प्रा. डॉक्टर एस व्ही एकलारकर, प्रा. दीपक भोसले डॉक्टर एस. एस .लंबे, प्रा. सुषमा चौगुले यांनी केले.

यावेळी कर्मयोगी पॉलिटेक्निकल चे प्राचार्य डॉक्टर ए बी कणसे, रजिस्टर जीडी वाळके उपप्राचार्य प्राध्यापक जगदीश मुडेगावकर, संशोधन अधिष्ठाता डॉक्टर अभय उत्पाद शैक्षणिक अधिष्ठाता प्राध्यापक राहुल पांचाळ तसेच विविध विभाग प्रमुख प्राध्यापक आणि कर्मचारी उपस्थित होते मान्यवरांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी संयोजक प्राध्यापक एस एस शिंदे प्राध्यापक दीप्ती कुलकर्णी प्राध्यापक अमरजीत देवकर आणि प्राध्यापक के एस देशपांडे यांचे मोलाचे मार्गदर्शन सहकार्य लाभले.

# कळंब तालुकास्तरीय मैदानी स्पर्धेत कै. अण्णासाहेब पाटील माध्यमिक विद्यालयाचे घवघवीत यश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनिधि/सुधाकर रणदिवे : कै अण्णासाहेब पाटील या विद्यालयाने तालुकास्तरीय मैदानी स्पर्धेत विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरीय स्पर्धे साठी पात्र झाले असुन शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर कॉलेज डिकसळ येथे तालुकास्तरीय स्पर्धे चे आयोजन करण्यात आले होते.



या स्पर्धेमध्ये विद्यालयाचे आदित्य गायकवाड २०० मीटर रनिंग मध्ये प्रथम, सोहम गायकवाड ५०० मीटर चालणे प्रथम, ४०० मी. हार्डक्स प्रथम, कार्तिक राठोड ४०० मीटर हार्डक्स द्वितीय, संकेत निंबोळे ८०० मीटर हार्डक्स प्रथम, साक्षी अंगरखे ४०० मीटर हार्डक्स प्रथम, प्रतीक्षा मुंडे ४०० मीटर हार्डक्स द्वितीय, ५०० मीटर चालणे प्रतीक्षा मुंडे प्रथम, व अक्षरा केसरे द्वितीय हातोडा जानवी झांजे प्रथम, व अक्षरा केसरी द्वितीय, क्रमांक मिळविला आहे, दिनांक २६ /२७ सप्टेंबर रोजी झालेल्या या स्पर्धे त विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता, यांच्या या यशामुळे वाटवडा गावासह कळंब तालुक्याच्या शिरपेच्या आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. या विद्यालयातील विद्यार्थ्यांचे शाळ-ेचे मुख्याध्यापक श्री बालाजी अल्टे सर, श्री पी जे कसबे सर, गायकवाड सर रामकिसन गायकवाड सर, शेळके सर, राजवाडे सर, चोरमुळे सर कांबळे सर तसेच ईतर शिक्षक व शिक्षकेतर व कर्मचारी यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

गावच्या सरपंच सौ .सुरेखा अल्टे व पोलीस पाटील यांनी सुद्धा या यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले असुन, या सर्व विद्यार्थ्यांना पी जे कसबे सर यांनी मार्गदर्शन केले होते.

# मोहोळ तालुक्याच्या पंढरपूर ऐवजी सोलापूर अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयत समावेश करण्याची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : मोहोळ तालुक्यातील जन-तेची प्रमुख मागणी आहे की, नव्याने स्थ-ापन होणाऱ्या पंढरपूर अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयात मोहोळ तालुक्याचा समावेश न करता, तो सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात ठेवावा. या मागणी-मागे भौगोलिक आणि दळणवळणाऱ्या सोयीस्करतीची कारणे दिली जात आहेत मोहोळ तालुक्यासाठी सोलापूर हे पंढरपूर पेक्षा अधिक जवळची आणि सोयीचे आहे, असे मत आमदार राजू खरे यांनी महसूलमंत्र्याकडे व्यक्त केले आहे.

या निर्णयामुळे मोहोळ तालुक्यात मोठी नाराजी आणि तीव्र संताप व्यक्त होत आहे. तालुक्यातील ग्रामपंचायत. नगरपरिषद ,नगरपंचायत, आणि विविध कार्यकारी सोसाट्यांनी ठराव देऊनही या निर्णयाकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे. माजी आम दार राजन पाटील यांनी या निर्णयाला तीव्र विरोध दर्शवत रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याचा इशाराही दिला आहे.

राज्य शासनाने सोलापूर जिल्ह्या-तील भौगोलिक विस्तार आणि वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन पंढरपूर येथे स्वतंत्र अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय कार्यान्वित करण्याचा निर्णय घेतला आहे.

मात्र या निर्णयाला मोहोळ तालुक्यातून तीव्र विरोध होत आहे.

ख्यमंत्री पवार मोहोळ सोलापूर पा-सून, तोडू नका अशी मागणी करण्यात येत आहे. मोहोळ तालुक्यात चारा टम्साई पाणीटंचाई, विजेचा प्रश्न ऐरणीवर असताना. पंढरपूर अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयाला जोडण्याचा मुद्दा ही ज्वलंत आहे.

# नळदुर्ग महाविद्यालयात नव मतदार नाव नोंदणी शिबीर संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस. के. गायकवाड : तुळजापूर तालुक्यातील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय नळदुर्ग आणि जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालय धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजना विभाग व राज्यशास्त्र विभागाच्या वतीने नव मतदार नाव नोंदणी शिबिराचे आयोजन महाविद्यालयात करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला नळदुर्ग येथील अप्पर तहसील कार्यालयाचे तह-सीलदार प्रमोद गायकवाड हे उप-स्थित होते तर या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुभाष राठोड सर होते. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. निलेश शेरे यांनी केले त्यांनी आपल्या प्रास्ताविकामध्ये भारतीय लोकशाही प्रगल्भ करायची असेल तर १८ वर्ष पूर्ण झालेल्या प्रत्येक तरुणाने आपले नाव मतदार यादी मध्ये नोंद करणे गरजेचे आहे. आणि मतदार यादी मध्ये आपले नाव समाविष्ट झाल्यानंतर मोठ्या प्रमाणात मतदान प्रक्रियेमध्ये सहभागी होणे गरजेचे आहे अशा प्रकारचे मत व्यक्त केले.

या कार्यक्रमाप्रसंगी नळदुर्ग येथील अप्पर तहसील कार्यालयाचे तहसीलदा प्रमोद गायकवाड यांनी महाविद्यालयातील तरुणांना मतदानाचे महत्त्व समजले पाहिजे तसेच आज १८ वर्षे पूर्ण झालेल्या प्रत्येक तरुणांची मतदार यादी मध्ये नावे समाविष्ट करण्यासाठी गाव पातळीवरती बी एल ओ च्या माध्यमातून तसेच राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांच्या माध्यमातून म ोठ्या प्रमाणात मतदार यादी मध्ये नावे समाविष्ट करण्याचा प्रयत्न केला जातो तरी देखील काही तरुण यापासून वंचित राहतात आणि म्हणून शासनाच्या माध्यमातून महाविद्यालयांमध्ये देखील तरुणांमध्ये जर आपण मतदाराच्या संदर्भात जागृती निर्माण केली तर १८ वर्षे पूर्ण केलेल्या प्रत्येक तरु-णाचे नाव मतदार यादीमध्ये समाविष्ट होईल हा दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून शासनाच्या माध्यमातून अशा प्रकारची शिबिरे आयोजित करण्यात आलेली आहेत असे मत व्यक्त केले.

अध्यक्षीय समारोपामध्ये म हाविद्यालयाचे प्राचार्य

डॉ.सुभाष राठोड यांनी भारतामध्ये प्रत्येक व्यक्तीला लोकशाही प्रक्रियेम ध्ये सहभागी होता यावे यासाठी भारतीय राज्यघटनेने वयाची १ ८ वर्षे पूर्ण करणाऱ्या व्यक्तीला मतद-ानाचा अधिकार बहाल केलेला आहे. त्यामुळे प्रत्येकाने आपले नाव मतदार यादी मध्ये समाविष्ट केले पाहिजे ही प्रत्येक तरुणांची जबाबदारी आहे. देशाचे भविष्य तरुणांच्या हातामध्ये आहे आणि जोपर्यंत हा तरुण जागरूक होत नाही,लोकशाही प्रक्रियेमध्ये सहभागी होत नाही तोपर्यंत देशाची प्रगती शक्य नाही असे मत व्यक्त केले.




या कार्यक्रमाला उपप्राचार्य डॉ अशोक कदम व कार्यालयीन अध-ीक्षक श्री धनंजय पाटील यांचे म ार्गदर्शन लाभले.

या कार्यक्रमाला राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ लक्ष्मण थिट्टे, डॉ. बृहस्पती वाघमारे, प्रा. बाबासाहेब सावते, डॉ. दीपक जगदाळे, डॉ. शिवतेज भोसले, प्रा. बालाजी क्षीरसागर, श्री. उमेश सर्जे, श्री. भागिनाथ बनसोड व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रा. सौ. पूजा रोंगे- भोसले यांनी साधला खानापूर तालुक्यातील शिक्षकांशी संवाद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सांगली : दरवर्षी सप्टेंबर महिन्याच्या चौथ्या रविवारी ‘जागतिक कन्या दिन’ साजरा केला जातो. खरं पाहिले तर प्रत्येक दिवसाची सुरवात कन्येचा चेहरा पाहून केल्यास दिवस बहारदार जातो. कन्या ह्या अशा स्वरूपाच्या असतात. त्यामुळे साहजिकच कन्येसाठी पित्याचे ढळते माप असते असे म्हणतात, हे खरे आहे. प्रत्येक पिता आपल्या कन्येबरोबरच फोटो स्टेट्सला ठेवून, कन्येला शुभेच्छा देणारा दिवस काल पाहायला मिळाला. एकीकडे सर्वत्र ‘जागतिक कन्या दिन’ साजरा करत असताना दुसरीकडे मात्र आपले पिता असलेल्या डॉ. बी.पी रोंगे सरांच्या मदतीला त्यांच्या कन्या प्रा. पूजा रोंगे-भोसले ह्या धावत असताना पाहायला मिळाल्या.



विभाग शिक्षक मतदार संघाची निवडणूक प्रक्रिया काही दिवसांवर येऊन ठेपली असून निवडणुकीच्या निमित्त-ाने तंत्रशिक्षणातील विविध उपक्रमामुळे राज्यात ज्ञानयात्री म्हणून ओळख निर्माण झालेल्या स्वेरीचे डॉ. बी. पी. रोंगे सर हे पायाला भिंगरी लावल्याप्रमाणे पाचही जिल्ह्यातील शिक्षकांशी संपर्क साधत आहेत, हे चित्र पाहायला मिळते. आज इथे तर उद्या दुसऱ्या जिल्ह्यात असे करत मागील वर्षातील ऑक्टोबर महिन्यापासून जरा-ही उसंत न घेता शिक्षकांच्या भेटीवर त्यांनी लक्ष केंद्रित केले आहे. यामुळे चारही जिल्ह्यांतील शिक्षकांबरोबर संवाद झाला आहे. प्रत्यक्ष भेटीतून ते आपले विचार शिक्षकांसमोर व्यक्त करत आहेत. ही बाब त्यांच्या कन्या प्रा. पूजा रोंगे -भोसले यांच्या लक्षात आली. त्यांनी ‘जागतिक कन्या दिना’च्या निमित्ताने पिता डॉ.बी.पी. रोंगे यांच्या मदतीला धाऊन आल्या. प्रा.पूजा रोंगे-भोसले यांनी सांगली जिल्ह्या-तील खानापूर तालुक्यातील रयत शिक्षण संस्थेचे जय भवानी विद्यालय बलवडी, श्री. राजकुमार संपतराव माने कृषी तंत्र विद्यालय खानापूर, भूड सिद्धनाथ विद्यालय भूड खाना-पूर, शेठ च. ग. शहा विद्यामंदिर व जुनिअर कॉलेज लेंगरे खा-नापूर, न्यू इंग्लिश स्कूल वाळ-ूज खानापूर, दाजी पाटलोजी विद्यालय व श्रीरंग दाजी देवकर जुनिअर कॉलेज वेजेगाव खा-नापूर, न्यू इंग्लिश स्कूल साळशिंगे खानापूर, न्यू इंग्लिश स्कूल गार्डी धानवड खाना-पूर, जीवन प्रबोधनी विद्यालय नागेवाडी खानापूर, जागृती विद्यालय चिखलहोळ खानापूर, विठ्ठलराव देशमुख अध्यापक विद्यालय माहुली खाना-पूर, महात्मा गांधी विद्यालय माहुली खानापूर, नानासाहेब शामरावजी विद्यालय देवीखिंडी खानापूर या १३ शाळांना भेटी दिल्या. या भेटीत त्यांनी तेथील शिक्षकांशी संवाद साधून डॉ. रोंगे सरांच्या विचारांचा वारसा तिथे चालविला. तेथील शिक्षकांना देखील प्रा. पूजा रोंगे यांचे विचार पटले असून त्यांनी उत्साहाने प्रतिसाद दिला. पुणे विभाग शिक्षक मतदार संघातील शिक्षक बांधवांच्या समस्या जाणून घेण्यासाठी आणि सकारात्मक बदलाचा विचार पोहोचवण्यासाठी सौ. पूजा रोंगे-भोसले यांनी भेट देऊन शिक्षक व तेथील प्राध्यापक वर्गाशी संवाद साधला. शिक्षकांच्या सन्मानासाठी आणि हक्कांच्या लढ्यासाठी प्रा. डॉ. बी. पी. रोंगे सर यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहण्याचा निर्धार यावेळी उपस्थित शिक्षक बांधवांनी व्यक्त केला. पुणे मतदार संघातील उपक्रमशील ज्ञानयात्री म्हणून राज्यात ओळख असलेल्या ओळख असलेल्या गोपाळप-ूर (ता.पंढरपूर) येथील स्वेरी अर्थात श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूटचे संस्थापक, स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य व खेड (ता. उत्तर सोलापूर) मधील स्वामी विवेकानंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे अध्यक्ष डॉ. बब्रुवाहन पांडुरंग रोंगे हे पुणे विभाग शिक्षक मतदार संघाची निवडणूक लढवीत आहेत. त्यांच्या विचारांना सर्वत्र प्रचंड प्रतिसाद मिळत असून डॉ.रोंगे सर पुणे विभागातील जवळपास सर्व जिल्ह्यातील शिक्षणाशी संपर्क साधला आहे. डॉ. रोंगे सर हे शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांवर लक्ष केंद्रित करत असल्याचे पहायला मिळत आहे. डॉ.रोंगे सर यांनी पुणे विभाग शिक्षक म तदार संघातील सांगली, सात-ारा, कोल्हापूर, पुणे व सोलापूर या पाचही जिल्ह्यांतील शाळा व कॉलेज मधील पदाधिकारी व शिक्षकांना भेटी देऊन त्यांच्या समस्या जाणून घेत आहेत. प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे यांनी शिक्षकांच्या प्रत्यक्ष भेटीच्या रूपाने प्रचारात मात्र आघाडी घेतली आहे हे स्पष्ट होत आहे. स्वेरीच्या स्थापनेपासून डॉ. रोंगे सरांची मुद्देसूद आणि व्यवस्थित मांडणी, प्रत्येक समस्येचा सुक्ष्म अभ्यास या धोरणांमुळे डॉ. रोंगे सरांच्या तंत्रशुद्ध अभ्यासाचा आता राज्याला फायदा होण-ार आहे, हे मात्र वाढत्या प्रतिसादावरून समजते. एकूणच डॉ. रोंगे सरांकडे शैक्षणिक क्षेत्रातील दिग्गज मंडळीचे लक्ष लागले आहे तसेच त्यांना पाचही जिल्ह्यांतील ५८ तालुक्यांतील शिक्षकांचा भक्कम प्रतिसाद मि ळत आहे. मागील वर्षभरापासून सुरू झालेल्या या काळात प्राचार्य डॉ. रोंगे सरांचे पाचही जिल्ह्यांत झंझावाती दौरे सुरु

### पित्याच्या मदतीला धावतेय कन्या

असून त्यांना सर्वत्र उस्फुर्तपणे प्रतिसाद लाभत आहे. मतदार नोंदणी पासून निवडणूकीच्या सर्व प्रक्रिया याबाबत डॉ. रोंगे सर प्रत्येक शाळेत, प्रत्येक शिक्षकांना, संस्थाचालकांना व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना भेट देवून चर्चा करत आहेत. या चर्चांना सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. यामध्ये अनेक शिक्षक संघटनांनी व पदाधिकाऱ्यांनी डॉ. रोंगे सरांना पाठिंबा दर्शविला आहे. या भेटीमध्ये सर्व शाळांम ध्ये प्राचार्य, मुख्याध्यापक, प्राध्यापक, शिक्षक वर्ग शिक्षकेत्तर कर्मचारी डॉ. रोंगे सरांचे कमालीचे स्वागत करत आहेत. आता त्यांच्या मदतीला त्यांच्या कन्या धावल्या असून त्यांनी खानापूर, आटपाडी म धील शिक्षकांशी संवाद साधून समस्या जाणून घेतल्या. प्रत्यक्ष भेटीवर भर देवून समस्या जाणून घेण्याला आता प्रा.पूजा रोंगे यांच्या माध्यमातून गती मिळाली आहे हे मात्र स्पष्ट होते. डॉ. रोंगे सरांप्रमाणेच प्रा. पूजा रोंगे यांच्या भेटींचे सर्वत्र स्वागत होत आहे. यावेळी प्रा. पूजा रोंगे म्हणाल्या की, ‘आज शिक्षकांसमोर अनेक प्रश्न, अडचणी, समस्या आहेत. त्या सर्व शासन पा-तळीवर अभ्यासपूर्ण पद्धती-ने मांडण्यासाठी स्वेरीचे सर्वे सर्वा डॉ.बी.पी. रोंगे सर हे कटिबद्ध आहेत. टीईटी, जुनी पेन्शन योजना अशा अनेक समस्या आहेत, त्यांचा त्यांनी बारकाईने अभ्यास केला आहे. तरी यासाठी जर आपण सेवा करण्याची संधी डॉ. रोंगे सरांना दिली तर जिद्द, चिकाटी आणि प्रामाणिक प्रयत्न करून अन-ुत्तरीत प्रश्न सोडविण्यासाठी ते कोठेही कमी पडणार नाहीत.’ अशी ग्वाही मी देते. यावेळी डॉ. रोंगे सरांनी आमदार होण्यापूर्वीच केलेल्या सर्व कामांची त्यांनी माहिती दिली.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# शेतकऱ्यांच्या जळत्या चितेवर राजकारणाची भाकरी भाजू नका; प्रवीण गीते यांचा संतप्त सवाल

## दुष्काळाच्या तीव्र झळा आणि राजकीय नेत्यांची श्रेयवादाची लाजीरवाणी लढाई..!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : राज्यातील दुष्काळग्रस्त भागातील शेतकरी आज अभूतपूर्व संकटाचा सामना करीत आहे. पावसाने पाठ फिरवल्याने खरीप पिकांची अवस्था बिकट झाली असून अनेक ठिकाणी पिके करपून गेली आहेत. पिण्याच्या पाण्यासह जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्नही गंभीर बनला आहे. अशा परिस्थितीत राज्य सरकारकडून दुष्काळ जाहीर करण्यात आला असला, तरी दुष्काळ जाहीर होताच त्याचे श्रेय घेण्यासाठी राजकीय नेत्यांमध्ये सुरू झालेली चढाओढ अत्यंत दुर्दैवी असल्याची संतप्त प्रतिक्रिया प्रवीण गीते यांनी व्यक्त केली आहे.

आमचं घर जळतंय आणि आमच्या व्यथा आम्हालाच ठाऊक आहेत! शेतकऱ्यांच्या शेतात उभी पिके डोळ्यांसमोर वाळत आहेत. उत्पादनासाठी केलेला खर्च, घेतलेली कर्जे आणि कुटुंबाच्या उदरनिर्वाहाची चिंता शेतकऱ्यांना सतावत आहे. अनेक कुटुंबांसमोर पुढील काळात घरखर्च कसा भागवायचा, कर्जाचे हप्ते कसे फेडायचे आणि जनावरांना चारा-पाणी कुठून उपलब्ध करून द्यायचे, असे गंभीर प्रश्न उभे ठाकले आहेत.



मात्र, शेतकऱ्यांच्या या वेदनांकडे गांभीर्याने पाहण्याऐवजी काही राजकीय नेते आणि त्यांचे समर्थक दुष्काळाच्या घोषणेचे श्रेय घेण्यासाठी सोशल मीडियावर एकमेकांशी स्पर्धा करत असल्याचा आरोप प्रवीण गीते यांनी केला. दुष्काळ हा राजकीय श्रेय घेण्याचा विषय नाही; तो लाखो शेतकरी कुटुंबांच्या जगण्यामरणाचा प्रश्न आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

**श्रेयवाद थांबवा, शेतकऱ्यांपर्यंत मदत पोहोचवा**

दुष्काळ जाहीर करण्याची प्रक्रिया पूर्ण झाली असेल, तर आता श्रेयवादाची राजकीय स्पर्धा थांबवून प्रत्यक्ष मदतीच्या अंमलबजावणीला प्राधान्य देण्याची गरज आहे. सरकारी घोषणा कागदावर न राहता त्याचा लाभ शेवटच्या शेतकऱ्यापर्यंत पोहोचणे आवश्यक आहे.

पीक नुकसानाचे तातडीने पंचनामे करून पात्र शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळावी. दुष्काळी परिस्थितीमुळे आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना शासनाच्या उपलब्ध नियमांनुसार कर्ज, वीजबिल व इतर आर्थिक सवलतींचा तातडीने लाभ मिळावा. पिण्याच्या पाण्याची टंचाई असलेल्या गावांमध्ये टँकरची व्यवस्था करावी तसेच जनावरांसाठी चारा व आवश्यक ठिकाणी छावण्यांची व्यवस्था करण्यात यावी, अशी मागणी प्रवीण गीते यांनी केली.

**राजकारणापेक्षा शेतकऱ्यांचे जगणे महत्त्वाचे**

दुष्काळाच्या काळात पक्षीय राजकारण, श्रेयवाद आणि सोशल मीडियावरील प्रसिद्धीपेक्षा शेतकऱ्यांच्या मूलभूत गरजा पूर्ण करणे महत्त्वाचे आहे. शेतकऱ्यांच्या अडचणींची पाहणी करून त्यावर तातडीने ठोस उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. सत्तेची आणि पदाची ऊब बाजूला ठेवून सामाजिक उत्तरदायित्व स्वीकारण्याची ही वेळ आहे. शेतकऱ्यांच्या डोळ्यातील अश्रू पुसण्यासाठी सर्वांनी एकत्र येणे गरजेचे आहे. दुष्काळाच्या परिस्थितीत राजकीय कागदी घोडे नाचविण्यापेक्षा प्रत्यक्ष मदत शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचली पाहिजे, असे प्रवीण गीते यांनी दिलेल्या प्रसद्धी पत्रकात म्हटले आहे.

**शेतकऱ्यांना तातडीने ठोस मदतीची गरज**



पिकांचे झालेले नुकसान, पाण्याची टंचाई, जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न आणि वाढता आर्थिक बोजा लक्षात घेता दुष्काळग्रस्त भागासाठी तातडीने व्यापक मदतकार्य राबविणे गरजेचे आहे. केवळ घोषणा करून प्रश्न सुटणार नाही, तर शासनाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी आणि पात्र लाभार्थ्यांपर्यंत मदत पोहोचणे आवश्यक आहे.

शेतकऱ्यांच्या अश्रूंवर आणि त्यांच्या दुःखावर राजकारण करू नका. श्रेयवादाची लढाई थांबवा आणि शेतकऱ्यांच्या पदरात प्रत्यक्ष मदत टाका. अन्यथा शेतकऱ्यांचा वाढता संताप दुर्लक्षित करणे कोणाच्याही हिताचे ठरणार नाही, असा इशारा प्रवीण गीते यांनी दिला.

---

# सोलापूर जिल्ह्यात उत्पादित चारा जिल्ह्याबाहेर वाहतूक करण्यास बंदी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

**दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांचा आदेश**

सोलापूर, (जिमाका) : सोलापूर जिल्ह्यात निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीचा विचार करून जिल्ह्यातील पशुधनासाठी चारा उपलब्ध राहावा, यासाठी जिल्ह्यात उत्पादित होणारा सर्व प्रकारचा चारा व मुरघास जिल्ह्याबाहेर किंवा अन्य राज्यात वाहतूक करून विक्री करण्यास बंदी घालण्यात आली आहे. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, सोलापूर एस. कार्तिकेयन यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ मधील कलम १४४ अन्वये हा आदेश जारी केला आहे.

जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त व कृषी व पशुसंवर्धन विभागाच्या एकत्रित माहितीनुसार, सोलापूर जिल्ह्यातील पशुधनास अंदाजे पुढील १२० दिवस म्हणजे डिसेंबर २०२६ अखेरपर्यंत पुरेल इतका चारा उपलब्ध असल्याचे नमूद करण्यात आले आहे. मात्र, जिल्ह्यात उत्पादित होणारा चारा व मुरघास इतर जिल्ह्यांत किंवा राज्यांत वाहतूक करून विक्री झाल्यास जिल्ह्यातील पशुधनासाठी चाऱ्याची उपलब्धता कमी होऊन चारा टंचाई व कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे.

जून २०२७ अखेर पर्यंत आदेश लागू

सदर आदेशानुसार सोलापूर जिल्ह्यात उत्पादित होणारा सर्व प्रकारचा चारा व मुरघास इतर जिल्ह्यात किंवा राज्यात वाहतूक करण्यास मनाई करण्यात आली आहे. हा आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून जून २०२७ अखेरपर्यंत लागू राहणार आहे. आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी जिल्ह्यातील संबंधित प्रशासकीय, पोलीस, कृषी, पशुसंवर्धन तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या यंत्रणांना कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.




जिल्ह्यातील पशुधनासाठी चाऱ्याची उपलब्धता कायम राहावी आणि संभाव्य चारा टंचाई टाळता यावी, या उद्देशाने जिल्हा प्रशासनाने हा प्रतिबंधात्मक निर्णय घेतला आहे.

# वळवाचा पाऊस तरी पडावा; शेतकऱ्यांची आस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी/प्रतिनिधी : पावसाने दडी मारल्याने टाकळीवाडी परिसरातील शेतकरी चिंतेत सापडले आहेत. खरीप हंगामातील पिकांना पाण्याची गरज असताना अपेक्षित पाऊस होत नसल्याने शेतकऱ्यांच्या अडचणी वाढत आहेत. त्यामुळे आता वळवाचा पाऊस तरी पडावा, अशी अपेक्षा शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे.

पावसाअभावी शेतातील पिकांची वाढ खुंटत असून जमिनीतील ओलावा कमी होत चालला आहे. काही ठिकाणी पिके कोमेजण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. पावसाची प्रतीक्षा करत शेतकरी आकाशाकडे डोळे लावून बसले आहेत.

वेळीच दमदार पाऊस झाला तर पिकांना मोठा दिलासा मिळू शकतो. मात्र पावसाने आणखी दडी मारल्यास खरीप हंगामावर त्याचा विपरीत परिणाम होण्याची भीती शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे. त्यामुळे वळवाचा जोरदार पाऊस पडून शेतीला जीवदान मिळावे, अशीच शेतकऱ्यांची अपेक्षा आहे.

---

# स्वेरी च्या विद्यार्थ्यांचे कौठाळीत स्वच्छता अभियान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर तालुक्यातील कौठाळी येथे एन. एस. एस डे निमित्त स्वेरी कॉलेज ऑफ इंजीनियरिंग मधील एनएसएस च्या विद्यार्थ्यांनी स्वच्छता अभियान राबवले. प्रारंभी संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन डॉ.महेश मठपती यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, गावातील अंतर्गत रस्ते व राजनंदिनी माध्यमिक विद्यालय परिसराची स्वच्छता केली. स्वच्छता अभियानामध्ये ग्रामस्थांनीही सहभाग घेतला याप्रसंगी विद्यार्थ्यांनी मोबाईल व सोशल मीडिया यावर पथनाट्य सादर करून ग्रामस्थांची मने जिंकली. यावेळी मोहन नागटिळक, संदीप पाटील, सागर गोडसे, रामदास नागटिळक, मुख्याध्यापिका सई शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमास अनिल नागटिळक, अरुण नागटिळक, बाळासाहेब धुमाळ, विठ्ठल पाटील, शिवाजी नागटिळक, समाधान चव्हाण, पांडुरंग नागटिळक, समाधान नागटिळक, दामोदर इंगोले युवान चे समन्वयक गोविंद लोखंडे, गायक कुलकर्णी, शुभम लोखंडे, अण्णा सलमपुरे आकाश भोसले, आर्यन नागटिळक यांच्या सह बहूसंख्या मान्यवर व ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी व्ही.बी बोचरे, पी. व्ही.शिखरे, पी. एस. तोंडे यांनी परिश्रम घेतले.

# सैनिक वेलफेअर असोसिएशनच्या वर्धापन दिनानिमित्त अंधश्रद्धा निर्मूलनावर व्याख्यान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाड/प्रतिनिधी : टाकळीवाडी : सैनिक वेलफेअर असोसिएशन, टाकळीवाडीच्या वर्धापन दिनानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्ताने १ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजता ग्रामपंचायत कार्यालय, टाकळीवाडी येथे अंधश्रद्धा निर्मूलन विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

या कार्यक्रमासाठी प्रसिद्ध कवी व दंगलकार मा. नितीन चंदनशिवे हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहणार आहेत. ते अंधश्रद्धा निर्मूलन या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत.

सैनिक वेलफेअर असोसिएशनच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित या कार्यक्रमास टाकळीवाडी परिसरातील नागरिक, युवक, महिला तसेच आजी-माजी सैनिक व त्यांच्या कुटुंबीयांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आजी-माजी सैनिक व समस्त ग्रामस्थ, टाकळीवाडी यांच्या वतीने करण्यात आले आहे.




---

**पुणे विभागीय शिक्षक मतदार संघासाठी भाजपकडून डॉ. बी.पी .रोंगे यांच्या नावाची चर्चा अ**

# भाजपकडून कोणाला लॉटरी लागणार?

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पुणे विभागीय शिक्षण मतदारसंघाच्या विधानसभेच्या निवडणुकीचे पडघम वाजू लागले असून उमेदवारीवरून राजकीय हालचालींना वेग आला आहे. विठ्ठल अभियांत्रिकी महाविद्यालयाचे संस्थापक सचिव डॉक्टर बी .पी .रोंगे यांनी भाजपकडून उमेदवारी मिळावी त्यासाठी मा श्री चंद्रकांत दादा पाटील यांच्याकडून उमेदवारी मिळण्यासाठी मोर्चे बांधणी केली जात आहे . गेले दहा वर्षापासून भाजपचे काम केल्याचा दावा असून, शिक्षकांच्या विविध प्रश्नवर सातत्याने भूमिका घेतल्यामुळे त्यांचे उमेदवाराची राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे.

दुसरीकडे महायुतीतील शिंदे गटाचे वैद्यकीय कक्षाचे प्रमुख श्री. मंगेश चिवटे यांनीही पुणे शिक्षक मतदार संघातून उमेदवारी मागितलेली चर्चा आहे. यामुळे माहिती कडून कोणता उमेदवार मैदानात उतरतो याकडे शिक्षासह राजकीय वर्तुळाची लक्ष लागले आहे.

डॉ.बी .पी. रोंगे गेली वर्षापासून पुणे विम्याचे शिक्षकांचे वीर अडचणी व प्रश्न सोडवण्यासाठी संपर्क अभियान सुरू केले आहे. शिक्षकांचे प्रश्नावर आवाज उठवताना आंदोलन उपोषण यासारख्या मार्गाचाही अवलंब त्यांनी केला आहे. त्यामुळे त्यांनी निवडणुकीपूर्वी शिक्षकाचा संपर्क वाढवला आहे.

**पुणे विभागीय शिक्षक मतदार संघातून उमेदवारीवरून राजकीय हालचालींना वेग**

पुणे शिक्षक मतदार संघात पुणे, सातारा ,सांगली, कोल्हापूर, आणि सोलापूर या पाच जिल्ह्यांमध्ये शिक्षक व कार्यकर्ते, सक्रिय झाल्या असून त्यांचे अनेक ठिकाणी स्वागताचे कार्यक्रम होत आहेत.

युतीत उमेदवारासाठी रस्सीखेच

राज्यात सध्या भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाचे माहिती सरकार आहे त्यामुळे पुणे विभागीय शिक्षक मतदार संघाची जागा महायुतीतील कोणत्या पक्षाला मिळणार आणि त्या पक्षाकडून कोणाला उमेदवारी दिली जाणार याबाबत उत्सुकता निर्माण झालेली आहे. भाजपकडून डॉक्टर बी.पी .रोंगे सर यांची चर्चा सुरू असतानाच शिवसेना शिंदे गटाकडून श्री मंगेश चिवटे यांनी उमेदवारीची इच्छा व्यक्त केल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे महायुतीच्या जागा वाटपाचा निर्णय महत्वाचा ठरणार आहे. त्याचबरोबर शिक्षक कृती समितीचे माजी आमदार श्री दत्तात्रय सावंत यांनी पुन्हा एकदा निवडणुकीसाठी रणसिंग फुकले आहे. त्यांनीही मोर्चेबांनी चालू केली आहे व त्यांनी कुठल्या पक्षाकडून मागणी केली आहे हे समजले नसले तरी, त्यांच्या हालचालीकडे राजकीय वर्तुळाची लक्ष आहे.

अधिसूचनेनंतर चेतन स्पष्ट होणार आहे. पुणे शिक्षक मतदार संघाची निवडणुकीचे अधिसूचना जाहीर झाल्यानंतर उमेदवारांची अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू होणार आहे. अर्ज दाखल करण्याच्या सुरुवातीच्या काळातच पुणे शिक्षक मतदार संघ व पुणे पदवीधर मतदारसंघ प्रमुख दावेदाराची चित्र स्पष्ट होण्याची शक्यता आहे.

# लोकशाही व्यवस्थेत माहिती अधिकार कायद्याची भूमिका महत्त्वाची : राहुल दवत




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड /प्रतिनिधी : माहितीचा अधिकार हा लोकशाही व्यवस्थेतील नागरिकांच्या सक्षमीकरणाचा प्रभावी मार्ग असून, शासनाच्या कामकाजात पारदर्शकता व उत्तरदायित्व निर्माण करण्यासाठी या कायद्याची महत्त्वपूर्ण भूमिका असल्याचे प्रतिपादन राहुल दवते यांनी केले.ते महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे पालखेड येथील न्यू इंग्लिश स्कूल विद्यालयात राज्य माहिती अधिकार दिनाच्या मार्गदर्शनपर व्याख्यानाप्रसंगी बोलत होते.याप्रसंगी व्यासपीठावर मुख्याध्यापक संजय दिघे, ज्येष्ठ शिक्षक अशोक शेळके आदी होते.

**पालखेडला राज्य माहिती अधिकार दिन साजरा**

पुढे बोलतांना राहुल दवते यांनी माहितीचा अधिकार कायदा, नागरिकांना उपलब्ध असलेले अधिकार, माहिती मागविण्याची प्रक्रिया, अर्ज कसा करावा, माहिती अधिकाऱ्याची भूमिका तसेच अपील प्रक्रियेबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. माहितीच्या अधिकाराचा योग्य व जबाबदारीने वापर केल्यास प्रशासन अधिक पारदर्शक आणि लोकाभिमुख होण्यास मदत होते,असेही दवते यांनी स्पष्ट केले.त्यानंतर मुख्याध्यापक संजय दिघे यांनी माहिती अधिकार कायदा - २००५ चे महत्त्व, त्याची पार्श्वभूमी, सामान्य नागरिकांना मिळालेले अधिकार आणि भ्रष्टाचार निर्मूलन, नागरिकांमध्ये माहितीच्या अधिकाराबद्दल जागरूकता निर्माण करणे, शासकीय कारभारात पारदर्शकता आणणे आणि लोकशाही अधिक मजबूत करणे हा यामागचा मुख्य उद्देश असल्याचे सांगितले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी माहिती अधिकारासंदर्भात विविध प्रश्न विचारले त्यास व्याख्याते राहुल दवते यांनी समर्पक उत्तरे देत विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केले.याप्रसंगी मुख्याध्यापक संजय दिघे, अशोक शेळके, निलेश गवांदे,सुनंदा दुर्धवळे ,संजय लव्हांगडे, मंगेश कागदे, शैलेश शिखरे,किरण थेटे, सागर जाधव,राजेंद्र नाठे, संदीप आहेर, दत्तात्रय पगार, सावन जाधव, संजय कोकतरे,कविता ढोमसे,सारिका पवळे,वैशाली मोते,ज्ञानेश्वर मातेरे,सुरेश गांगुर्डे, रामदास पवार, नदीम तांबोळी आदी उपस्थित होते,कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सावन जाधव यांनी तर आभार अशोक शेळके यांनी मानले.

# ई – पिक पाहणी तात्काळ करून घ्या : तहसिलदार

## विशाल नाईकवाडे यांचे आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड तालुक्यातील शेतकऱ्यांनी खरीप हंगाम २०२६ – २७ साठी ई – पिक पाहणीची नोंद तात्काळ व अचूक पद्धतीने करून घ्यावी, असे आवाहन निफाडचे तहसीलदार विशाल नाईकवाडे यांनी केले आहे.

तालुक्यातील एकही शेतकरी ई-पिक पाहणीच्या नोंदणीपासून वंचित राहू नये, यासाठी शेतकऱ्यांनी वेळेत ही प्रक्रिया पूर्ण करून घ्यावी, त्यासाठी ई – पिक पाहणीसाठी शेतकऱ्यांनी गुगल प्ले स्टोअरवरून 'ई-पिक पाहणी' हे मोबाईल प डाउनलोड करून त्यामध्ये शेतकरी म्हणून नोंदणी करावी. मोबाईल क्रमांक व ओटीपीच्या माध्यमातून नोंदणी पूर्ण केल्यानंतर संबंधित खाते क्रमांक, भूमापन क्रमांक किंवा गट क्रमांक, क्षेत्र आणि खरीप २०२६ हंगामाची निवड करावी.

**खरीप हंगाम २०२६-२७ साठी प्रत्येक शेतकऱ्याने ई-पिक पाहणीची नोंद वेळेत व अचूक पद्धतीने करून घ्यावी. पिकाची प्रत्यक्ष पाहणी करून योग्य माहिती व छायाचित्र नोंदविणे आवश्यक आहे. ई-पिक पाहणीची नोंद शेतकऱ्यांच्या पिकाची अधिकृत नोंद म्हणून महत्त्वाची ठरणार आहे. त्यामुळे निफाड तालुक्यातील एकही शेतकरी या प्रक्रियेपासून वंचित राहू नये, यासाठी शेतकऱ्यांनी स्वतःहून पुढाकार घेऊन नोंदणी पूर्ण करावी.**
**– विशाल नाईकवाडे**
**तहसिलदार, निफाड**

यानंतर शेतकऱ्यांनी प्रत्यक्ष शेतात जाऊन घेतलेल्या पिकाची योग्य नोंद करावी आणि पिकाचे स्पष्ट छायाचित्र काढून नोंद सादर करावी. यावेळी मोबाईलमधील स्थान निश्चिती (जीपीएस) व इंटरनेट सुविधा सुरू ठेवणे आवश्यक आहे.

नोंद सादर करण्यापूर्वी सर्व माहिती अचूक असल्याची खात्री करावी. नोंदणीमध्ये काही चूक झाल्यास नोंद केल्यानंतर ४८ तासांच्या आत दुरुस्ती किंवा नोंद रद्द करण्याची सुविधा उपलब्ध आहे.



ई-पिक पाहणीची अचूक नोंद ही शेतकऱ्यांच्या पिकाची अधिकृत नोंद म्हणून महत्त्वाची ठरणार आहे. त्यामुळे निफाड तालुक्यातील प्रत्येक शेतकऱ्याने ई-पिक पाहणी करून घ्यावी आणि कोणताही शेतकरी या प्रक्रियेपासून वंचित राहणार नाही, यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन तहसीलदार विशाल नाईकवाडे यांनी केले आहे.

# राज्यातील ज्येष्ठ नागरीकांच्या प्रश्नांवर मुख्यमंत्र्यांनी मार्ग काढावा : आमदार सुहास बाबर

**विट्यातले पिठलं भाकरी ठिय्या आंदोलन मागे घेण्यात आले.**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

आटपाडी/प्रतिनिधी : राज्यातील ज्येष्ठ नागरीकांच्या विविध प्रश्नांवर आवश्यक त्या उपाययोजना व्हाव्यात . त्यांना शासनामार्फत सेवा सुविधा देण्यासाठी विधेयक आणावे. अशी मागणी खानापूर विधानसभा मतदार संघाचे आमदार सुहासभैय्या बाबर यांनी राज्याचे मुख्यमंत्री ना . देवेंद्र फडणवीस यांना खास पाठविलेल्या पत्राद्वारे केली आहे.

आमदार सुहास बाबर यांनी ज्येष्ठ नागरीकांच्या प्रश्नावर दाखविलेली तत्परता व आस्था याबाबत आमदार सुहास बाबर यांचे खास अभिनंदन करून सदरचे १ ऑक्टोबरचे विट्यातील पिठलं भाकरी ठिय्या आंदोलन मागे घेत असल्याचे अर्थक्रांती जीवन गौरव ज्येष्ठ नागरीक संघटनेच्या वतीने सर्वश्री सादिक खाटीक, भास्कर गायकवाड, रावसाहेबकाका पाटील, नंदकुमार राक्षे, अरविंद चांडवले, दत्तात्रय मोकाशी, विठ्ठलराव देशमुख, बाळासाहेब गायकवाड , सौ . गुलशन वंजारी, सौ मंदाकिनी पाटील, सौ . सुश्मिता मोटे, सौ . शांताबाई मोकाशी, सौ . राबियाँबसरी खाटीक, सौ . अश्विनी तोरणे, श्री . रामचंद्र भिसे यांनी पत्रकाद्वारे जाहीर केले आहे.

ज्येष्ट नागरीकांच्या विविध प्रश्नांवर आणि प्रलंबीत विधेयकावर आमदार सुहास बाबर यांनी जोरदार आवाज उठवावा म्हणून येत्या १ ऑक्टोबर रोजी विटा येथे आमदारांच्या दारात पिठलं भाकरी ठिय्या आंदोलन करण्याची घोषणा काही दिवसापूर्वी अर्थक्रांती जीवन गौरव ज्येष्ट नागरीक संघटनेच्या वतीने केली होती.

आमदार सुहास बाबर यांनी मुख्यमंत्री महोदयांना पाठविलेल्या पत्राची प्रत माहितीसाठी आटपाडीचे ज्येष्ट पत्रकार सादिक खाटीक यांना पाठविली आहे .

आमदार सुहास बाबर यांनी आपल्या पत्रात, राज्यातील ज्येष्ट नागरीकांनी आपल्या आयुष्याचा मोठा काळ राज्याच्या विकासासाठी योगदान म्हणून दिला आहे . वाढत्या वयामुळे आरोग्य, आर्थिक सुरक्षितता, दैनंदीन गरजा तसेच शासकीय सेवांचा लाभ घेताना त्यांना विविध अडचणींचा सामना करावा लागत आहे. ज्येष्ट नागरीकांना सन्मानपुर्वक व सुरक्षित जीवन जगता यावे, यासाठी शासनाच्या माध्यमातून त्यांच्या विविध प्रश्नांवर ठोस आणि प्रभावी उपाय योजना करणे आवश्यक आहे . यामध्ये ज्येष्ठ नागरीकांसाठी आरोग्य सुविधा अधिक सुलभ करणे, शासकीय व सार्वजनिक सेवांमध्ये प्राधान्य देणे . इतर आवश्यक सुविधांमध्ये सवलती व सुविधा उपलब्ध करून देणे . तसेच आर्थिकदृष्ट्या गरजु ज्येष्ट नागरीकांना शासकीय पेन्शन मिळणेसाठी प्रभावी व्यवस्था करणे . या बाबी महत्वाच्या आहेत . याबाबत ज्येष्ठ नागरीकांसाठी शासना मार्फत सेवा सुविधा देण्यासाठी विधेयक आणणे गरजेचे आहे . आमदार सुहास बाबर यांनी असल्याचे म्हंटले आहे.

# मराठा महासंघाचे संस्थापक कै.आमदार आण्णासाहेब पाटील यांच्या जयंतीनिमित्त विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर : अखिल भारतीय मराठा महासंघाचे संस्थापक, माथाडी कामगारांचे आराध्य दैवत, मराठा आरक्षणाचे जनक,क्रांतीसुर्य,थोर मराठा कै.आमदार आण्णासाहेब पाटील यांच्या ९३ वी जयंती अखिल भारतीय मराठा महासंघाचे सोलापूर जिल्हाध्यक्ष श्री अर्जुनराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली साजरा करण्यात आली.प्रतिमेचे पुजन करुन पुष्पहार अर्पण करण्यात आला.आण्णासाहेबांचा जयघोष करण्यात आला. जयंतीनिमित्त विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले.शहिद मेजर कुणालगिरी गोसावी अंधशाळेत बालकांना मिष्ठान्न भोजन, मातोश्री वृद्धाश्रम गोपाळपूर येथे फळे व खाऊ वाटप यासह विविध उपक्रम राबविले.यावेळी लोकमंगल बँकेचे मॅनेजर श्री विनोद जगदाळे साहेब, आण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ पंढरपूर विभागीय समन्वयक श्री सौरभ मगर,मराठा महासंघाचे जिल्हा उपाध्यक्ष सचिन गंगथडे,युवक जिल्हाध्यक्ष शिवाजी मोरे,पंढरपूर तालुका अध्यक्ष संतोष जाधव, शहराध्यक्ष अमोल पवार, शहर संघटक काका यादव, शहर कार्याध्यक्ष पांडुरंग शिंदे, रिक्षा संघटना अध्यक्ष नागेश गायकवाड,युवक शहराध्यक्ष शुभम ताठे-देशमुख, विद्यार्थी आघाडी जिल्हाध्यक्ष हणमंत कदम,व्यापार उद्योग आघाडी अध्यक्ष नानासाहेब शिंदे, मालवाहतूक संघटना अध्यक्ष सोमनाथ झेंड, महिला तालुका उपाध्यक्ष अर्चनाताई चव्हाण,जेष्ठ मार्गदर्शक उद्योजक कृष्णा ढोकळे,राजेंद्र चव्हाण यांच्या सह समाज बांधव, महामंडळाचे लाभार्थी, मराठा महासंघाचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.यावेळी विविध मान्यवरांनी मार्गदर्शनपर मनोगत व्यक्त केले.

# ढोल-ताशांच्या निनादात पडघ्यात बाप्पाला निरोप; विसर्जन मिरवणुकीत भक्तीचा उत्साह

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील अनेक गावांचा केंद्रबिंदू आणि मध्यवर्ती बाजारपेठ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पडघा येथे दहा दिवस मनोभावे सेवा केलेल्या गणरायाला अनंत चतुर्दशीच्या मुहूर्तावर भावपूर्ण वातावरणात निरोप देण्यात आला. अकरा दिवसांच्या वास्तव्यानंतर बाप्पाच्या मूर्ती सजवलेल्या ट्रॅक्टर, टेम्पो व चारचाकी वाहनांतून वाजतगाजत पडघा येथील ओहळ आणि कुंभीरी नदीवरील विसर्जन घाटावर नेण्यात आल्या. यावेळी पडघेकरांनी 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या'चा जयघोष करत आपल्या लाडक्या बाप्पाला निरोप दिला. विसर्जन मिरवणुकीत फटाक्यांची आतषबाजी, ढोल-पथकाचा ठेका तसेच पारंपरिक वेशभूषेतील महिला-भगिनींचा सहभाग हे विशेष आकर्षण ठरले. तसेच विद्युत रोषणाईने सजवलेले वाहन सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. पडघा ग्राम पंचायतीच्या वतीने दोन्ही विसर्जन घाटांवर , पिण्याचे पाणी आणि प्रकाशाची व्यवस्था करण्यात आली होती. तसेच कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पडघा पोलिस



ठाणे व होमगार्ड जवानांचा चोख बंदोबस्त ठेवला होता. या विसर्जन मिरवणुकीत ८० हून अधिक गणेशमूर्तींचे विसर्जन करण्यात आले. यावेळी पडघे गावातील अनेक गणेशभक्त मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# घरातील महिला सक्षम असेल तर घराची प्रगती लवकर होते : श्रीकांत यादव



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : भरभराट आणि प्रगती साधायची असेल, तर घरातील महिला सक्षम असणे अत्यंत आवश्यक आहे. महिला सक्षम असेल तर कुटुंबाची प्रगतीही लवकर होते, असे प्रतिपादन श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी श्रीकांत यादव यांनी केले.

पंढरपूर तालुक्यातील भाळवणी येथील यशश्री क्लासेस येथे एलआयसी, प्रिती ऑनलाईन शॉप व तेज न्यूज यांच्या वतीने आयोजित गौरी गणपती सजावट स्पर्धा २०२६ च्या बक्षीस वितरण समारंभात ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते.

यावेळी महसूल सहाय्यक अधिकारी राहुल सावंत, एलआयसीचे विकास अधिकारी बी. एस. चौगुले, सरपंच रणजित जाधव, सेवानिवृत्त तलाठी धोंडीराम शिंदे, सेवानिवृत्त अधिकारी बाळासाहेब कापसे, ज्येष्ठ पत्रकार आनंद देशपांडे, यशश्री क्लासेसचे संचालक प्रवीण लिंगडे, पांडुरंग नागरी पतसंस्था सचिव नूतन चौगुले



यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

स्पर्धेतील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. मिना माणिक कोले यांनी प्रथम क्रमांक पटकावत १,००० रुपये, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र मिळविले. पूनम सुनील माने यांना द्वितीय ७०० रुपये, तर जान्हवी घनश्याम कवडे यांना तृतीय ५०० रुपये व प्रमाणपत्र देण्यात आले. तसेच उमा राजेंद्र शिंदे, संध्या संभाजी लोखंडे आणि किरण जयवंत भोसले, सोनाली विशाल माळी यांच्यासह सहभागी १५ स्पर्धकांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राची माळवदे यांनी केले. सूत्रसंचालन ओंकार माळवदे यांनी केले, तर आभार प्रशांत माळवदे यांनी मानले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सविता कापसे, अनुजा देशपांडे, कोमल शिंदे, वर्षा गांधी, अथर्व चौगुले,अमृता चौगुले यांच्यासह सहकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

**सागरी भूमिपुत्रांच्या प्रश्नांना मिळणार सामूहिक व्यासपीठ; आज होणार महासंघाची स्थापना**

# सागरी समाजाच्या हक्कांसाठी 'सागरी भूमिपुत्र महासंघ' सज्ज

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : मुंबई महानगर प्रदेशातील सागरी पट्ट्यातील भूमिपुत्रांच्या विविध प्रश्नांना एकत्रितपणे वाचा फोडण्यासाठी 'सागरी भूमिपुत्र महासंघा'ची स्थापना करण्यात येत आहे. ठाणे, रायगड, पालघर, मुंबई शहर आणि मुंबई उपनगर या पाच जिल्ह्यांतील विविध समाजघटक, शेतकरी, मच्छिमार, प्रकल्पग्रस्त, गावठाण रहिवासी, युवक आणि महिलांना एका व्यापक व्यासपीठावर आणण्याचा या महासंघाचा उद्देश आहे. खासदार सुरेश (बाळ्यामामा) म्हात्रे यांच्या पुढाकारातून या संघटनात्मक उपक्रमाची सुरुवात होत आहे.

महासंघाचा स्थापना सोहळा मंगळवार, २९ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ९ ते दुपारी १ या वेळेत ठाणे पश्चिम येथील राम गणेश गडकरी रंगायतन येथे होणार आहे. यावेळी विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती राहणार असून सागरी भूमिपुत्रांशी संबंधित सामाजिक, सांस्कृतिक आणि स्थानिक प्रश्नांवरही चर्चा होणार आहे.

मुंबई महानगर प्रदेशाचा झपाट्याने विस्तार होत असताना विविध पायाभूत सुविधा आणि औद्योगिक प्रकल्पांमुळे स्थानिक नागरिकांसमोर जमीन, गावठाणे, कोळीवाडे, पुनर्वसन, रोजगार आणि पर्यावरणाचे प्रश्न निर्माण झाले आहेत. या प्रश्नांवर वेगवेगळ्या संस्था आणि संघटना कार्यरत असल्या तरी पाचही जिल्ह्यांतील समान प्रश्न एकत्रितपणे मांडण्यासाठी स्वतंत्र व्यापक व्यासपीठ उभारण्याचा प्रयत्न महासंघाच्या माध्यमातून केला जात आहे. गावठाणांमधील जुन्या घरांची पुनर्बांधणी, घरांच्या परवानग्या, गावठाण विस्तार आणि मूलभूत सुविधांशी संबंधित प्रश्नांवरही महासंघ लक्ष केंद्रित करणार आहे. शासनाकडून जाहीर करण्यात आलेल्या निर्णयांची प्रभावी अंमलबजावणी व्हावी, यासाठी पाठपुरावा केला जाणार आहे. सिडको, एमएमआरडीए, एमआयडीसी, जेएनपीए, बुलेट ट्रेन, वसई-विरार-अलिबाग कॉरिडॉर, कोस्टल रोड तसेच वाढवण बंदर यांसारख्या विविध प्रकल्पांच्या पार्श्वभूमीवर शेतकरी आणि प्रकल्पग्रस्तांच्या जमिनी, मोबदला, पुनर्वसन, पुनर्स्थापना आणि रोजगाराचे प्रश्न पुढे आले आहेत. स्थानिक भूमिपुत्रांच्या हक्कांचे संरक्षण करताना विकास प्रक्रियेत योग्य मोबदला, पुनर्वसन आणि रोजगाराच्या संधी मिळाव्यात, तसेच स्थानिक नागरिकांचा सहभाग राहावा, यासाठी महासंघाच्या माध्यमातून भूमिका मांडण्यात येणार आहे.

सागरी पट्ट्यातील मच्छिमारांसाठी पारंपरिक मच्छिमारी आणि जलसंपदेचे संरक्षण हा महत्त्वाचा विषय आहे. वाढते औद्योगिकीकरण, शहरीकरण आणि प्रदूषणामुळे खाड्या, जलस्रोत आणि समुद्रकिनारी परिसंस्थेवर होणाऱ्या परिणामांचा प्रश्नही महासंघाच्या अजेंड्यावर राहणार आहे. पारंपरिक मच्छिमारांचे हक्क, उपजीविकेचे संरक्षण आणि सागरी पर्यावरणाचा समतोल राखण्यासोबतच स्थानिक नागरिकांना निर्णयप्रक्रियेत योग्य स्थान मिळावे, यासाठी प्रयत्न करण्याची भूमिका महासंघाकडून मांडली जाणार आहे. महानगर प्रदेशात उद्योग आणि सेवा क्षेत्राचा विस्तार होत असताना स्थानिक युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, यासाठी कौशल्यविकास, शिक्षण, उद्योजकता आणि व्यवसायवाढीवर भर देण्यात येणार आहे. शिक्षण व आरोग्याच्या क्षेत्रातही स्थानिक नागरिकांना सक्षम करण्यासाठी आवश्यक उपाययोजनांचा पाठपुरावा करण्याचे उद्दिष्ट महासंघाने ठेवले आहे. वीज वितरण, वाढीव वीजबिले, ग्राहक सेवा आणि तक्रारी यांसारख्या नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित प्रश्नांवरही महासंघ आवाज उठविणार आहे. टॉरेंटसारख्या वीज वितरण कंपन्यांशी संबंधित ग्राहकांच्या तक्रारींकडे शासन आणि संबंधित यंत्रणांनी लक्ष द्यावे, अशी भूमिका मांडण्यात येणार आहे.

दि. बा. पाटील यांच्या नावासाठी पाठपुरावा: नवी मुंबई विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्याच्या मागणीचाही महासंघाच्या माध्यमातून पाठपुरावा करण्यात येणार आहे. महाराष्ट्र विधानसभेने आणि विधानपरिषदेने यासंदर्भात ठराव मंजूर करून तो केंद्र शासनाकडे पाठविल्याचे आयोजकांकडून सांगण्यात आले.

प्रकल्पग्रस्तांच्या हक्कांसाठी दि. बा. पाटील यांनी केलेल्या कार्याच्या पार्श्वभूमीवर विमानतळाला त्यांचे नाव देण्याची मागणी पुढे नेण्यात येणार आहे.

'एक प्रश्न, एक आवाज, एकजूट'चा संदेश : पाचही सागरी जिल्ह्यांत विविध समाजांच्या संस्था, संघटना, शेतकरी, मच्छिमार आणि प्रकल्पग्रस्त स्वतंत्रपणे कार्यरत आहेत. मात्र समान प्रश्नांवर एकत्रित भूमिका मांडण्यासाठी व्यापक व्यासपीठाची आवश्यकता असल्याने 'एक प्रश्न – एक आवाज – एकजूट' या संकल्पनेतून महासंघाची उभारणी केली जात आहे.



सामाजिक, प्रशासकीय आणि धोरणात्मक पातळीवर भूमिपुत्रांचे प्रश्न सामूहिकरीत्या मांडण्याचे काम महासंघाच्या माध्यमातून केले जाणार आहे.

स्थापना सोहळ्यास परमपूज्य बालयोगी सदानंद महाराज यांची विशेष उपस्थिती राहणार आहे. तसेच पद्मविभूषण शरदचंद्र पवार आणि पद्मश्री लक्ष्मण माने यांचीही उपस्थिती राहणार आहे. सागरी भूमिपुत्र समाजातील सामाजिक व सांस्कृतिक योगदानाचा गौरव म्हणून भिकल्या लाडक्या पिंडा यांना 'विशेष सागरी रत्न पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. कार्यक्रमास आमदार किसन कथोरे, ज्येष्ठ नेते आर. सी. पाटील, आमदार रमेशदादा पाटील (अध्यक्ष, कोळी महासंघ), आमदार राजेश मोरे, आमदार शांताराम मोरे, शिवसेना नेते (शिंदे गट) प्रकाश पाटील, शिवसेना उपनेत्या (उबाठा गट) ज्योतीताई ठाकरे तसेच प्रदीप साळवी (आगरी सेना प्रमुख) यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.